ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ


LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३७ पुणे, बुधवार, १७ नोव्हेंबर, १९७१ अंक २१


## पंपाची अचूक निवड कशी कराल ?

खरेदीची किंमत कमी ........ पण चालविण्याचा खर्च जास्त

खरेदीची किंमत थोडी जास्त पण चालविण्याचा खर्च कमी



STUSA 772

## किर्लोस्कर 'केई' पंप

पंप खरेदी करताना 'किर्लोस्कर' पंपाचीच निवड करा.

पंपाची निवड करताना खरेदीच्या किंमतीपेक्षाहि त्याचा चालविण्याचा खर्च लक्षांत घ्यावा लागतो. कारण हा खर्च रोजच्या रोज करावा लागतो. एखादा पंप किंमतीच्या दृष्टीनें स्वस्त असला पण त्याचा रोजचा तेलाचा किंवा विजेचा खर्च बाजवीपेक्षा जास्त येऊ लागला तर वर्षाअखेर हिशेब करताना तो पंप खूपच महाग पडला आहे असे दिसून येते.

- किर्लोस्कर 'केई' पंप या हिशेबाने फायदेशीर पंप आहे.
- या पंपाची कार्यक्षमता जास्त असल्यामुळे त्याचा विजेचा किंवा तेलाचा खर्च खूपच कमी येतो.
- किर्लोस्कर 'केई' पंप कमी वेळांत पुरेसा पाणीपुरवठा करीत असल्यामुळे मजुरीतहि बचत होते.
- म्हणून खऱ्या हिशेबी दृष्टीने पाहिले तर किर्लोस्कर 'केई' पंप स्वस्तच पडतो.

किर्लोस्कर

किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड
उद्योगभवन, टिळक रोड, पुणे २

® Registered users of the Trade Mark

# ठाकरसी कापडाने फॅशनची रंगत वाढते!



पुढचं पाऊल काय टाकावं हे कळेनासं होतं तेव्हा—प्रथम ठाकरसी कापड वापरा. मग कोणत्याहि कामासाठी आवश्यक सळसळतं चैतन्य, उल्हसित करणारा उत्साह आणि तरतरी वाटू लागेल! फॅशनच्या क्षेत्रांत आघाडीवर राहण्यासाठीं खुशाल पाऊल टाका नि ठाकरसीचं कापड घ्या. एव्हरफ्रेश (६७% 'टेरीन' ३३% कॉटन) साड्या, फ्रॉकचे कापड, शर्टिंग्ज आणि सूटिंग्ज, स्क्रीन प्रिंट्स, २×२ पॉप्लिन, रंगीत/प्रिंटेड् कॅम्ब्रिक्स, वॉयल्स, डॉबीज्, जेकार्डस्, आणि अनेक प्रकारचे कापड.

Madison/HSW/14 Mar

**दि हिंदुस्थान स्पिनिंग अॅण्ड वीव्हिंग मिल्स लि.**, १६, अपोलो स्ट्रीट, मुंबई-१

# ☆ अर्थ ☆

बुधवार, १७ नोव्हेंबर, १९७१.





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## लोकांचा पैसा गुंतविल्यावर जबाबदारी आलीच

आयुर्विमा कॉर्पोरेशन आणि इतर सार्वजनिक वित्तीय संघटना ह्यांनी खाजगी मालकीच्या विभागातील उद्योगधंद्यांत भांडवल गुंतविलेले आहे. अर्थातच ह्या गुंतवणुकीच्या सुरक्षिततेची जबाबदारी पर्यायाने त्यांच्यावर पडते. आयुर्विमा कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. टी. ए. पै ह्यांनी ह्याविषयी एका मुलाखतीत आपले विचार प्रकट केले आहेत. ते म्हणतात की सर्वच खाजगी मालकीचे कारखाने नीट चालविले जातात असे नाही. काही कारखाने गैरवाजवी पद्धतीने चालविले जातात. अशा कारखान्यात सार्वजनिक वित्तीय संघटनांनी भांडवल गुंतविलेले असल्यास त्याच्या कारभारात लक्ष घालणे अयोग्य होणार नाही. कारभार अव्यवस्थित चालविण्यामुळे अशा कारखान्यांचे व अप्रत्यक्षपणे लोकांचे नुकसान होते. म्हणून त्यांच्या कारभारावर नजर ठेवण्याविषयी सरकारला सूचना करण्याचा विचार करण्यात येत आहे. बँका आणि इतर वित्तीय सार्वजनिक संघटना ह्यांनी खाजगी मालकीच्या उद्योगधंद्याच्या एकूण भांडवलापैकी ४२ टक्के साधारण भागभांडवल पुरविलेले आहे. उदा. कापडाच्या गिरण्या. ह्या उद्योगधंद्यात सार्वजनिक मालकीच्या वित्तीय संघटनांनी २०० ते २५० कोटी रुपये गुंतविलेले आहेत. खाजगी मालकीच्या इतर मोठ्या उद्योग-धंद्यांतही असेच मोठे भांडवल गुंतविण्यात आलेले आहे. इतके भांडवल गुंतविल्यावर ह्या कारखान्यांचा कारभार कसा काय चालला आहे ह्यासंबंधी उदासीन राहणे अर्थातच योग्य होणार नाही. गैरकारभार चाललेल्या उद्योगधंद्यांत केव्हा हस्तक्षेप करता येईल ते ठरविण्याविषयी मध्यवर्ती सरकारला सूचना करण्यात आल्या आहेत.

---

## आर्थिक वाढीशिवाय नुसत्या नौकऱ्या व्यर्थ

दिल्ली येथील इंन्स्टिटयूट ऑफ मॅनपॉवर रीसर्च ह्या संघटनेच्या वार्षिक सभेत बोलताना अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांनी महत्त्वाचे विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले की लोकांना अधिकाधिक रोजगार उपलब्ध करणे आवश्यक आहे ह्यात शंका नाही. परंतु नुसत्या नौकऱ्या देणे उपयुक्त ठरणार नाही. नौकऱ्या देत असताना योग्य त्या प्रमाणात आर्थिक वाढ होईल ह्याकडेही लक्ष देण्यात आले पाहिजे त्याचप्रमाणे रोजगारांच्या वाढी-बरोबर राष्ट्रीय उत्पन्नात भर पडते की नाही इकडेही लक्ष पुरविले पाहिजे. अर्थव्यवस्थेच्या निरनिराळ्या विभागात व उद्योगधंद्यांत नवीन रोजगार उपलब्ध करून देण्यास कितपत वाव आहे ह्याविषयी स्पष्ट कल्पना असणे अगत्याचे आहे. आपल्या देशांत भांडवलाची टंचाई आहे. म्हणून ज्या तंत्रविज्ञानाने आणि संस्करणाच्या पद्धतीने कमी भांडवलात अधिक रोजगारीच्या संधी उत्पन्न होतील त्या प्रकारचे तंत्रविज्ञान आपण विकसित केले पाहिजे. जास्तीत जास्त आर्थिक वाढ आणि जास्तीत जास्त रोजगार हे आपले साध्य आहे. ते गाठण्यासाठी पैशाविषयीच्या व उद्योगधंद्याविषयीच्या धोरणात कोणते बदल करणे आवश्यक आहे तेही समजून घेण्यात आले पाहिजे. खोल अभ्यासातून उगम पावलेल्या अशा ज्ञानाच्या अभावी रोजगारांच्या वाढत्या संधी आणि टिकाऊ आर्थिक विकास ह्यांची सांगड घालता येणार नाही. नियोजन यंत्रणेला आणि सरकारला ह्यासंबंधीची जरूर ती माहिती पुरविण्यासाठी संघटनेने एक नवीन यंत्रणा स्थापन करण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे.

---

## टेलिव्हिजन पाहण्यास तयार व्हा

मुंबईमधील टेलिव्हिजन केंद्र १९७२ अखेर सुरू होईल. पश्चिम जर्मनीने केंद्राची यंत्रसामग्री दिली आहे, तिची किंमत एक कोटी रुपये भरेल. प. जर्मनी हिंदी तंत्रज्ञांना केंद्र चाल-विण्याचे शिक्षणही देणार आहे. ६० कि. मी. परिसरात केंद्राचे कार्यक्रम पाहाण्यास मिळतील. क्षेत्र वाढवून पुण्यातील लोकांनाही कार्यक्रम पाहाण्यास मिळावे, ह्यासाठी सिंहगडावर रीले सेंटर उभारण्यात येत आहे. मुंबई येथून क्षेपित केलेले कार्यक्रम मायक्रो वेव्ह व्यवस्थेनुसार सिंहगड सेंटरद्वारा पुण्याला पुन: क्षेपित केले जातील. दिल्लीचे कार्यक्रम मुंबईत बघण्यास मिळायला चवथ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीपर्यंत वाट पाहावी लागेल. कारण, पोस्ट आणि तार खात्याने मुंबई आणि दिल्ली यांच्या दरम्यान मायक्रो वेव्ह लिंक आधी तयार करायला हवी. सध्या मुंबईप्रमाणे श्रीनगर, मद्रास, कलकत्ता, लखनौ आणि कानपूर येथे टेलिव्हिजन केंद्रे उभारण्याचे काम चालू आहे. टेलिव्हिजन निर्मिति सेटस्च्या ऑर्डरी नोंदू लागले आहेत. प्रत्येक सेटची किंमत २,००० रु. ते २,८०० रुपये असेल. ज्या पडद्यावर टेलिव्हिजनचे कार्यक्रम बघावयाचे, त्याचा आकार महत्त्वाचा असतो. कारण प्रेक्षक आणि पडदा ह्यात पुरेसे अंतर नसेल तर डोळ्यांना ताण पडतो. म्हणजे ज्या खोलीत सेट बसवावयाचा,

त्या खोलीचे क्षेत्रफळ महत्त्वाचे ठरते. पडद्याच्या रुंदीच्या सहा ते आठ पट अंतरावर प्रेक्षकाने बसणे इष्ट. सध्या चार कारखानदार टेलिव्हिजन सेट बनवीत आहेत. टेलेरॅड, पॉलेस्टर, जे. के. इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलेस्टारॅड. प्रत्येकाला दरसाल १०,००० सेटस् तयार करण्याचा परवाना देण्यात आलेला आहे. इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, हिंदुस्थान एरॉनॉटिक्स लि. आणि भारत इलेक्ट्रॉनिक्स ह्या प्रत्येकाला सालिना २०,००० सेटसच्या निर्मितीचा लायसेन्स आहे. भारतीय बनावटीच्या सेटमध्ये आयात सुटे भाग १०० रुपयांपर्यंत किंमतीचे असतात. दोन-तीन वर्षांत सुट्या भागांचे प्रमाण कमी होईल.

### आपद्ग्रस्तांना तातडीची मदत : महाराष्ट्र बँकेचा उपक्रम

नागपुरातील सिताबर्डी विभागातील "संगम" चाळीतील बिऱ्हाडकरूंना गेल्या महिन्यात झालेल्या मुसळधार पावसाने अक्षरशः निराधार बनविले. काही तास त्या चाळीत जिकडे-तिकडे पाणीच पाणी झाले. त्यामुळे त्या चाळीला बरीच दुरुस्ती करण्याची आवश्यकता निर्माण झाली. यावेळी तेथील बँक ऑफ महाराष्ट्राचे असि. जनरल मॅनेजर श्री. एस. पी. घारपुरे आणि डिव्हिजनल मॅनेजर श्री. एम. एन. वाके यांनी तातडीने तेथे जाऊन नुकसानीचा अंदाज घेतला व तत्काळ या आपग्रस्तांच्या अर्जाची छाननी करून सुमारे दहा हजार रुपयांची माफक व्याजाची कर्जे मंजूर केली. अशा रीतीने योग्य वेळी मदत करून मोठाच दिलासा दिल्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद देणारी अनेक पत्रे बँकेच्या पुणे येथील प्रमुख कचेरीकडे आणि नागपूर येथील कचेरीकडे येत आहेत. वास्तविक आपद्ग्रस्तांना मदत करण्याची या बँकेची परंपरा जुनीच असून त्याधोरणानुसारच या अधिकाऱ्यांनी तातडीने कामगिरी बजावली. पुण्याच्या पानशेत धरण फुटीच्या वेळी, बारामतीजवळील सणसर या गावास आगीने घेरले त्या प्रसंगी, गरजूंच्या मदतीसाठी महाराष्ट्र बँक तातडीने धावून गेली होतीच.

### श्रीमंत शेतकऱ्यावर कर बसविण्यास वाव

गेल्या काही वर्षांत ग्रामीण भागात श्रीमंत व सधन शेतकऱ्यांचा एक नवीन वर्ग उदयास आला आहे. हा वर्ग छोट्या शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यास उत्सुक नसतो. त्यांच्या उत्पन्नावर प्राप्ती कर घेण्यात येत नाही. आर्थिक नियोजनासाठी लागणारा पैसा अपुरा पडत असल्यामुळे सधन शेतकऱ्यांकडून प्राप्तीवरील कर घेण्यात यावा असे अनेकदा आग्रहाने सुचविण्यात येते. ह्या सूचनेला सधन शेतकऱ्यांचा अर्थातच विरोध आहे. लोकसभेत एका महाराष्ट्रीय खासदाराने सांगितलेल्या माहितीप्रमाणे दर साल ३६ हजार रुपयापर्यंतचे शेतीचे उत्पन्न करमाफ आहे. उलटपक्षी शहरांतील सालिना ६ हजाराचे उत्पन्नही प्राप्तीकराच्या कक्षेत येते. भारत सरकारच्या नियोजनखात्याच्या सल्लागार समितीला अलीकडे एक पत्रक धाडण्यात आले आहे. ह्या पत्रकात नव्याने श्रीमंत झालेल्या शेतकऱ्यांवर प्राप्तीकर बसविण्यास भरपूर आधार आहे असे नमूद करण्यात आले आहे. पत्रक म्हणते की सध्या शेतीवर घेण्यात येणारा कर शेतसाऱ्याच्या रुपाने घेण्यात येतो. दर हेक्टरमागे ठराविक सारख्या दराने तो आकारण्यात येतो. त्यामुळे ह्या करात वाढ करण्यास काहीच जागा राहिलेली नाही. जमिनीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाशी व किंमतीशी त्याचा काही संबंध राहिलेला नाही. नियोजन समितीच्या अंदाजाप्रमाणे शेतसारा व शेतीच्या उत्पन्नावरील कर ह्यामुळे १९७०-७१ साली १३७ कोटी रुपये गोळा झाले. ह्या उलट बिगर-शेती उत्पन्नावरील कर ४७३ कोटी रुपये मिळविण्यात आला.

### खासदारांचा पहिल्या वर्गासाठी आग्रह

एअर इंडिआने जंबो विमानांची मुंबई न्यूयॉर्क वाहतूक सुरू केली आहे. गेल्या १७ व ३१ तारखेला ह्या विमानाच्या फेऱ्या झाल्या. ह्या प्रवासाचा शुभारंभ करण्यासाठी ४० खासदारांना आमंत्रण देण्यात आले होते. जंबो विमानात अल्प भाड्याचा एक वर्ग व पहिला वर्ग असे दोन वर्ग आहेत. खासदारांना पहिल्या वर्गाने प्रवास करू दिला असता तर परतीच्या प्रत्येक तिकिटामागे २,२६६ रुपये परदेश प्रवासावरील कर म्हणून द्यावे लागले असते. खासदारांना करातून वगळण्यास सरकारचे अर्थखाते नाखूष होते. असे केल्यास एक अनिष्ट पायंडा पडेल असे खात्याला वाटत होते. हा कर एअर इंडिआला भरावयास सांगण्यास मुलकी विमान वाहतूक खाते तयार नव्हते. अखेर सर्व खासदारांना अल्प भाड्याच्या वर्गाने प्रवासास पाठविण्याचे ठरविण्यात आले. परंतु खासदारांनी पहिल्या वर्गाच्या प्रवासाची संधी नाकारण्यात आल्याबद्दल नापसंती दर्शविली. काहींचे म्हणणे असे की भारत वर्गरहित समाजरचनेकडे मार्गक्रमण करीत असताना अशा प्रकारचा भेदभाव दाखविणे बरोबर नाही. इतर काही खासदारांच्या मताने अल्प भाड्याच्या वर्गाने इतक्या लांबचा प्रवास करणे गैरसोयीचे होते. कारण प्रवासात विमान कोठेही थांबणारे नव्हते. शिवाय खासदारांच्या इतमामाला अशा प्रवासामुळे कमीपणाही येईल. सर्व खासदारांनी ह्या शुभारंभाच्या प्रवासाचे आमंत्रण अखेर स्वीकारले. सरकारी अधिकाऱ्यांनाही पहिल्या वर्गाने जाऊ देऊ नये असे त्यांचे म्हणणे आहे.

### थकबाकी वाढली नाही; थोडी कमीच झाली

३१ मार्च, १९७० रोजी इनकमटॅक्सची थकबाकी ५०७ कोटी रु. होती, ती ३१ मार्च, १९७१ रोजी ४९९ कोटी रुपयांवर आली. त्यापूर्वीच्या वर्षांतून थकबाकी वाढत चालली होती. (१९६८: ३७४ कोटी रु., १९६९ : ४३५ कोटी रु.) त्या दृष्टीने थकबाकी फारच थोडी कमी झाली, तरी ही गोष्ट अभिनंदनीयच मानली पाहिजे. थकबाकीची वाढ रोखली गेली आहे.

## जपानी व्यापार मंडळाची स्वस्तिकला भेट



भारत-जपान व्यापार वृद्धीच्या पाहणीसाठी सहा सदस्यांचे एक उच्चाधिकारी जपानी मंडळ भारताच्या दौऱ्यावर असून दि. १५ ऑक्टोबर रोजी त्यांनी स्वस्तिक रबर प्रॉडक्टसला भेट दिली. टोकियो चेंबर्स ऑफ कॉमर्सच्या लघु व मध्यम व्यापार समितीचे अध्यक्ष श्री. याझोयाशिदा यांच्याकडे मंडळाचे नेतृत्व होते.

या जपानी मंडळाने स्वस्तिकचा चिंचवड येथील कारखाना हिंडून पाहिला. स्वस्तिकच्या उत्पादनाचा दर्जा व गुणवत्ता ह्याबद्दल त्यांचे अत्यंत अनुकूल मत झाले.

टोकियोच्या चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲन्ड अिंडस्ट्रिजने जपान सरकारच्या पाठिंब्याने हे मंडळ भारतात पाठविले होते. भारतामध्ये भांडवल गुंतवणुकीला वातावरण, त्याचप्रमाणे उभयतांच्या संयुक्त जबाबदारीवरील प्रकल्पांची शक्यता अजमावणे हे त्याचे प्राथमिक उद्दिष्ट होते.

---

**५०० ब्रिटिश ट्रॅक्टर्सची आयात** — ५०० डेव्हिड ब्राउन ट्रॅक्टर्सची आयात करण्याचा करार भारताने केला आहे. ह्या करारान्वये कंपनीला भारतात ट्रॅक्टर्स बनविण्याचा परवाना देण्यात आला आहे. कंपनी दरसाल ५,००० ट्रॅक्टर्स तयार करील. कंपनीच्या कारखान्यास ७५ कोटी रु. खर्च येईल आणि तो उत्तर प्रदेशात उभारण्यात येईल.

**सॅमी पटेलवरील खटला** — सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या लंडन शाखेचे मॅनेजर, सॅमी जमशेद पटेल, ह्यांच्यावरील अफरातफरीबाबत खटल्यास १४ फेब्रुवारी रोजी लंडन येथे प्रारंभ होईल. सध्या ते पोलीस कस्टडीमध्ये आहेत.

**कुटुंब नियोजनावर मर्यादा घाला** — "भारतातील लोकसंख्येचे नियंत्रण जरा बेतानेच करा; जपानची लोकसंख्यावाढ रोखून धरण्यात मी केलेली चूक तुम्ही करू नका" असा मित्रत्वाचा सल्ला जपानचे पंतप्रधान मि. सॅटो ह्यांनी श्रीमती इंदिरा गांधी ह्यांना दिला आहे.

## रशियन व्यापार मंडळाची स्वस्तिकला भेट



तीन सदस्यांच्या एका रशियन शिष्ट मंडळाने दिनांक १४ ऑक्टोबर रोजी स्वस्तिक रबर प्रॉडक्टसला भेट दिली. स्वस्तिकच्या पादत्राणांची रशियामध्ये निर्यात करण्याबाबत त्यांनी यावेळी चर्चा केली.

या शिष्टमंडळाचे नेतृत्व नवी दिल्ली येथील रशियन व्यापार प्रतिनिधी श्री. कादिनिकोव्ह यांच्याकडे होते. स्वस्तिकचे दुरंगी पी. व्ही. सी. गमबूट, बास्केट बॉल शूज आणि रबरी गमबूट याबाबत त्यांनी विशेष आस्था दाखविली.

या शिष्टमंडळामध्ये मॉस्कोच्या मे. राझनेत्र स्पोर्टचे श्री. एव्हडोकिनोव्ह आणि श्री. लिखाशेव हेही होते. नवी दिल्ली येथील राज्य व्यापार महामंडळाचे मार्केटिंग मॅनेजर श्री. सी. पी. हजेला, हेही त्यांच्या समावेत उपस्थित होते.

---

**निर्बीजीकरणासाठी रजा** — निर्बीजीकरणाची शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या आपल्या कर्मचाऱ्यांना सहा दिवसांची खास कॅज्युअल रजा देण्याचे मध्यवर्ती सरकारने ठरविले आहे. स्त्री-कर्मचाऱ्यांना स्टरिलायझेशनसाठी १४ दिवसांची आणि IUCD इन्सर्शनसाठी एका दिवसाची खास कॅज्युअल रजा मिळेल.

**बांगला देश परिस्थितीचा भुर्दंड** — बांगला देश परिस्थितीमुळे भारताला चालू आर्थिक वर्षात ५०० कोटी रुपयांचा बोजा सहन करावा लागेल, असे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. एस. जगन्नाथन् ह्यांनी म्हटले आहे. महापूर आणि दुष्काळ ह्यामुळे अंदाजपत्रकातील तूट खूपच वाढणार आहे, असेही त्यांनी सांगितले. ही तूट भरून काढण्यासाठी पुरवणी अंदाजपत्रकाची शक्यता बोलली जात आहे.

**इजिप्तमधील वकिलातींना संरक्षक मोफत मिळणार नाहीत** — इजिप्तमधील परदेशांच्या वकिलातींना दरवाजाजवळ इजिप्शिअन पिस्तुलधारी संरक्षक हवे असतील, तर त्यासाठी दरमहा ६० इजिप्शिअन पौंड (१,०२० रु.) त्यांना द्यावे लागतील, असे त्यांना कळविण्यात आले आहे. सध्या त्याबद्दल काही पैसे घेण्यात येत नाहीत.

## THE BELGAUM BANK LIMITED

**Estd. 1930**

SCHEDULED BANK

*Regd. Office* : 659–60, Raviwar Peth, Belgaum

**Working Funds : Over Rs. 7 Crores**

**Share Capital & Reserves : Over Rs. 17 Lacs**

40 Branches in the States of Mysore & Maharashtra & Goa Territory – Major Number of Branches in Rural Areas – Facility of Safe Deposit Lockers at Belgaum, Gokak and Nipani Branches in Mysore State.

**S. Y. KAMAT**
*General Manager.*

**K. B. KIRTIKAR**
*Chairman.*



## ओगले

## प्रभाकर कंदील

- अंधाऱ्या रात्री,
- वादळी वाऱ्यात,
- ओबड-धोबड रस्त्यावर,
- खवळलेल्या दर्यावर

**मार्गदर्शक व विश्वसनीय.**


तयार करणार

ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड

ओगलेवाडी ( जि. सातारा )



## किर्लोस्कर एंजिन साठी बँक कर्ज-योजनेचा फायदा घ्या



तुम्ही फक्त थोडी रक्कम रोख भरायची. बाकीचे पैसे बँक कर्जाऊ देते.

आपल्या नजीकचा किर्लोस्कर विक्रेता याबाबतीत सर्व मार्गदर्शन व मदत देईल.

किर्लोस्कर

दर्जेदार डिझेल एंजिनाचे उत्पादक
किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड
खडकी, पुणे-३ (भारत)

® एंजिनसाठी किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड यांनी या ट्रेडमार्कच्या उपयोगाचा अधिकार नोंदविलेला आहे.

## टपाल वस्तूवर ‘ निर्वासित साहाय्यता ’ कर पाच पैशाचे खास तिकिट लावूनच भरला पाहिजे

भारताच्या राष्ट्रपतींनी जारी केलेल्या वटहुकुमानुसार दि. १५-११-१९७१ पासून “ निर्वासित साहाय्यता ” कर काही डाक वस्तूंवर आकारण्यात आला आहे. हा कर पोस्टकार्डे, सवलतीच्या दराने पाठविण्याकरिता नोंदवण्यात आलेली वर्तमानपत्रे व अंध साहित्याची पाकिटे यांवर आकारण्यात येणार नाही. पाठवण्याच्या मनीऑर्डरी व तारांवर सुद्धा हा कर आकारण्यात येईल.

हा कर भरण्याची पद्धत पुढील प्रमाणे असेल :—

(१) दि. १५-११-१९७१ पासून सर्व डाक घरात एक ५ पैसे दराचे तिकीट विकण्यात येईल. या तिकिटावर (निर्वासित साहाय्यता) “ रिफ्युजी रीलिफ ” असे इंग्रजी शब्द असतील. नेहमीच्या टपाल हशीलाशिवाय हे विशिष्ट प्रकारचे ५ पैशाचे तिकीट वर नमूद केलेले अपवाद वगळता सर्व प्रकारच्या डाक वस्तूंवर लावलेच पाहिजे. सर्वांचा विशिष्ट कर नवीन काढलेल्या “ निर्वासित साहाय्य ” या तिकिटानेच लावला पाहिजे. मूळ पोस्टाच्या तिकिटाच्या रूपाने होणाऱ्या किमतीत ५ पैसे मिळवून पोस्टाचेच जादा रकमेचे तिकीट लावून चालणार नाही. असे जादा रकमचे तिकीट लावले तर ते हिशेबात न घेता दंड म्हणून १० पैसे वसूल करण्यात येतील. जर अशा प्रकारचे तिकीट न लावलेली वस्तू निदर्शनास आली तर त्या वस्तूचा बटवडा करताना कराच्या दुप्पट रक्कम स्वीकारणाऱ्याकडून अथवा पाठवणाऱ्याकडून वसूल केली जाईल. मनीऑर्डर करतेवेळी मनीऑर्डरच्या फॉर्मवर हे कराचे तिकीट लावले असले पाहिजे, त्याशिवाय मनीऑर्डर स्वीकारण्यात येणार नाही. तारांच्या बाबतीत हा कर रोखीने भरावयाचा आहे. कर दिला असल्याची नोंद तारेच्या पावतीवर केली जाईल.

(२) ज्या व्यक्ती वा संस्था फ्रँकिंग यंत्राचा वापर करतात त्यांनी सुद्धा हा कर ५ पैशाच्या तिकिटाच्या स्वरूपात भरावयाचा आहे. मात्र त्यांना हवे असेल तर ते स्वतत्र फ्रँकिंग यंत्र याकरिता विकत घेऊ शकतील किंवा त्यांनी एकूण पाठवावयाच्या वस्तू इतकी रक्कम रोखीने डाकघरात भरावी अशी सवलत त्यांना देण्यात येईल.

(३) रजिस्टर करण्याकरता आणलेल्या वस्तू वा डाक प्रमाणपत्र घेण्याकरता आणलेल्या वस्तूंवरहिं हा कर भरणे आवश्यक आहे.

(४) हा कर सरकारी कामकाजाच्या वस्तूंवरही भरणे आवश्यक आहे.

(५) दि. १५–११–७१ पासून पाकिटे, अंतर्देशीय पत्रे व मनीऑर्डरचे फॉर्म ह्यांवर त्या वस्तू डाकघरातून विकताना कराचे तिकीट लावण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. परंतु ज्यांच्याकडे या गोष्टी आधीच असतील त्यांच्याकरता ५ पैशांची विशिष्ट तिकिटे विक्रीस ठेवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

## महाराष्ट्र सरकारच्या १९७२ सालातील सुट्ट्या

महाराष्ट्र सरकारने १९७२ सालच्या सार्वजनिक सुट्या पुढीलप्रमाणे जाहीर केल्या आहेत.

गणतंत्रदिन ( जानेवारी २६ )
बकरीद ( जानेवारी २७ )
मोहरम ( फेब्रुवारी २६ )
होळी ( फेब्रुवारी २९ )
गुढीपाडवा ( मार्च १६ )
गुडफ्रायडे ( मार्च ३१ )
ईद-इ-मिलाफ ( एप्रिल २७ )
महाराष्ट्रदिन ( मे १ )
स्वातंत्र्यदिन ( ऑगस्ट १५ )
पारशी नववर्षदिन ( ऑगस्ट २८ )
गणेशचतुर्थी ( सप्टेंबर ११ )
दसरा ( ऑक्टोबर १७ )
दिवाळी [ अमावास्या ] ( नोव्हेंबर ६ )
दिवाळी बलिप्रतिपदा ( नोव्हेंबर ७ )
रमझान ईद ( नोव्हेंबर ८ )
नाताळ ( डिसेंबर २५ )

२८ मे रोजी बुद्धजयंती रविवारी पडत असल्याने ती वेगळी सुट्टी दिलेली नाही.

## बँकांच्या कचेऱ्यात आठ महिन्यात १,०१८ ची वाढ

१९७१ च्या पहिल्या आठ महिन्यात व्यापारी बँकांनी १,०१८ नव्या शाखा उघडल्या. त्यांपैकी ६०७ शाखा ज्या ठिकाणी एकही बँक कचेरी नव्हती, अशा ठिकाणी उघडण्यात आल्या. १,०१८ नव्या शाखांपैकी ८६६ शाखा पब्लिक सेक्टरमधील बँकांच्या होत्या. ( राष्ट्रीयीकृत बँकांच्या ५५५ शाखा आणि स्टेट बँकेच्या ३११ शाखा ). १४ व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण होण्यापूर्वी, ३१ जून, १९६९ रोजी, व्यापारी बँकांच्या एकूण कचेऱ्यांची संख्या ८,२६२ होती; ३१ ऑगस्ट, १९७१ रोजी ती १२,१९८ झाली.

जून १९६९ मध्ये ६५,२०० लोकसंख्येस एक बँक कचेरी असे प्रमाण होते. हे प्रमाण ३९,००० लोकसंख्येस एक बँक कचेरी, असे लवकरच होईल. कारण १,९२५ लायसेन्सेस आणि ॲलॉटमेंटस अजून वाट पाहात आहेत.

## हवाई सुंदरींनो, बेढब दिसू नका

एखाद्या कारखान्यात किती 'माणसे' काम करतात असे विचारण्यात येते. इंग्रजीत मात्र ह्या माणसांना 'हॅण्डस' असे संबोधण्यात येते. ह्याचा अर्थ असा की कारखानदारांना माणसाच्या काम करणाऱ्या हाताविषयीच काय ती आस्था असे. त्याला पोट आणि डोके असते ह्याची फारशी दखलच घेतली जात नसे. कामगार संघटित झाल्यावर अर्थातच ही परिस्थिती बदलली. तरी सुद्धा काम करणाऱ्या माणसाच्या आरोग्याविषयी कारखानदाराला फिकीर करण्याचे कारण असत नाही. विमानात हवाई सुंदरी म्हणून काम करणाऱ्या तरुणींच्या आरोग्याकडे व सौंदर्याकडे मात्र दुर्लक्ष करून चालणार नाही. ग्रीसमधील एका विमान कपनीला हा प्रश्न कोर्टापुढे नेऊन धसास लावावा लागला. त्याचे असे झाले: ह्या कंपनीतील दोन हवाई सुंदरी जरा अधिक वजनदार झाल्या. तेव्हा कंपनीने एक महिनापर्यंत विमानात करण्यास त्यांना बंदी केली आणि आहारावर नियंत्रण ठेवून वजन कमी करण्याची सूचना केली. हवाई सुंदरींची संघटना होतीच. तिने हा प्रश्न कोर्टात नेला. त्यांचे म्हणणे असे की त्यांच्यावर बजावण्यात आलेला हुकूम हा करारभंग करणारा आणि त्यांच्या खाजगी जीवनावर आक्रमण करणारा आहे. कोर्टाने त्यांचे म्हणणे ऐकून घेतले आणि कंपनीला संबंधित हुकूम देण्याचा अधिकार आहे असा निर्णय दिला. हवाई सुंदरींनी आकर्षक दिसावे ही कंपनीची अपेक्षा बरोबर आहे. सुडौल बांधा त्यासाठी आवश्यक आहे. लठ्ठपणामुळे बांधा बेडौल झाल्यास आकर्षकता कमी होते. तेव्हा त्यांना ठीकठाक करण्याचा कंपनीला हक्क आहे असा युक्तीवाद कोर्टाने केला.

---

## चिनी प्रतिनिधींना अमेरिकन व्हिसा नको

युनायटेड नेशन्समध्ये तैवानची हकालपट्टी होऊन चीनला प्रवेश मिळाला असला तरी अमेरिका आणि चीन ह्या दोन देशांचे राजनैतिक संबंध अस्तित्वात नाहीत. चिनी मंडळाला अमेरिकेत येण्यासाठी व्हिसा लागला असता आणि त्याची व्यवस्था त्रयस्थ देशांमार्फत करावी लागली असती; चिनी मंडळ युनायटेड नेशन्सच्या बैठकीला वेळेवर येऊच शकले नसते. म्हणून चिनी प्रतिनिधींच्या पासपोर्टवर अमेरिकन व्हिसा अनावश्यक ठरविण्याचा निर्णय अमेरिकन सरकारने घेऊन तो मध्यस्तांमार्फत चिनी सरकारला कळविला आहे.

---

## वांग्यांच्या झाडांवर बँक कर्जाने फवारा

"मट्टु-गुल्ला" जातीच्या वांग्यांच्या झाडांवर कृमिनाशक द्रव्यांचा फवारा मारण्यासाठी सिंडिकेट बँक कर्जे देत आहे. ही वांगी उडपीजवळ मट्टु ह्या खेड्यात लावली जातात आणि मुंबईत काही ठराविक दुकानांत ती मिळतात. फवारा मारण्याच्या कामास प्रारंभ झाला आहे.

## कामोद्दीपक वाङ्मयाची कराचीत चलती

परदेशीय चलनाने युद्धोपयोगी सामग्री घेता यावी म्हणून पाकिस्तानने अनेक बंधने जाहीर केलेली आहेत. परंतु तरीही त्या देशाला परदेशीय चलनाची टंचाई भासत आहे. त्यामुळे परदेशातून येणाऱ्या कामोद्दीपक वाङ्मयाची व चित्रपटांची आयात करणे अवघड झाले आहे. ह्याचा परिणाम असा झाला आहे की पाकिस्तानात अशा प्रकारचे वाङ्मय व चित्रपट तयार करण्याचा धंदा वाढीला लागून त्यांची चलती होत आहे. म्हणून कामुक चित्रपटात काम करण्यासाठी अनेकदा रस्त्यावरील कोणालाही निवडण्यात येते. हे कलाकार पुरुष असतील तर त्यांना कामासाठी काहीही दिले जात नाही. छोट्यामोठ्या नटनटी बरोबर काम करण्यास मिळाले ह्यावरच ते खूष असतात. स्त्रियांना म्हणजे मुख्यत: तरुण मुलींना चांगली प्राप्ती होते. त्यांना दररोज २५ रुपये मिळतात. पाकिस्तानचे दरडोई राष्ट्रीय वार्षिक उत्पन्न सुमारे ५०० रुपये आहे. घरी खाजगी रीत्या दाखवावयाच्या एका चित्रपटाला ५०० रुपये पडतात. कराचीमधील श्रीमंत एदी लोकांच्या घरातूनच असे चित्रपट दाखविण्यात येतात. एकट्या कराची शहरात कामुक वासनांना उत्तेजित करणाऱ्या वाङ्मयाची विक्री करणारी ५० दुकाने आहेत. त्यामधून बहुतेक परदेशी वाङ्मय चोरून विकण्यात येते. आता देशी साहित्यही फुलू लागले आह. उर्दू भाषेतील कथा, कादंबऱ्या आणि मासिके ह्या परिस्थितीचा फायदा घऊन लैंगिक व बीभत्स वाङ्मय मुक्त हस्ताने प्रसिद्ध करीत आहेत.

---

## अमेरिकेत हिंदी विद्यार्थ्यांचा दुसरा क्रमांक

अमेरिकेत शिक्षणासाठी गेलेल्या हिंदी विद्यार्थ्यांच्या संख्येबाबत भारताचा दुसरा क्रमांक लागतो. सध्या एकूण १२,५२३ हिंदी विद्यार्थी अमेरिकेत आहेत. कॅनडाचा अनुक्रम भारतावर म्हणजे पहिला लागतो. कॅनडाचे १२,५९५ विद्यार्थी अमेरिकेत शिकत आहेत. अमेरिकेत शिक्षणासाठी आलेल्या व शाळाकॉलेजातून प्रवेश मिळविलेल्या विद्यार्थ्यांची संख्या गेली १६ वर्षे सतत वाढत आहे. सध्या त्यांची संख्या १,२२,७०८ इतकी आहे. आशिआतील देशांतून सर्वात अधिक विद्यार्थी येतात. त्यात एजिनिअरिंगचे विद्यार्थी जास्त असतात. १९६९–७० मधील त्यांच्या संख्येत चालू वर्षी ७ टक्क्यांनी वाढ झाली. वाढीचा आकडा ९,७५९ आहे.

---

**उशीरा विवाह करण्याचे फायदे** — "उशीरा लग्न करण्याचे पुष्कळच फायदे असतात. कित्येक गोष्टींचा अनुभव घेण्याची संधी मिळते. तुम्ही व्यक्ती बनू शकता; स्वतंत्र होऊ शकता," असे मत ऑस्ट्रेलियाच्या पंतप्रधानांची पत्नी मिसेस विल्यम मॅकमोहन ह्यांनी व्यक्त केले आहे. त्यांचे आजचे वय ३९ आणि त्यांच्या पतीचे वय ६९ आहे.

## सहकारी क्षेत्रांतील तीन प्रमुख उणिवा

(१) सहकारी संस्थांच्या कक्षेत गरीब व पददलित लोकांना आणण्यातील अपयश

(२) शेतकी आणि आनुषंगिक उद्योगधंद्यांच्या आधुनिकीकरणाबाबत संथपणा

(३) कार्यक्षम व्यवस्थापकांची चणचण

### सहकारी संस्थांच्या नियंत्रण शक्तीचे विकेंद्रीकरण हवे

गरीब व पददलित लोकांना नियोजनाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेऊन प्रगतीची फळे चाखावयास मिळावीत या हेतूने सहकारी क्षेत्रात त्यांना आणावयास हवे होते. तथापि ही गोष्ट साधू शकली नाही ही या क्षेत्रांतील पहिली उणीव आहे. त्या दृष्टीने ग्रामीण सहकारी पतपुरवठा संस्थांचे उदाहरण पाहता येईल. या संस्थांनी दिलेल्या कर्जाची छाननी केली असता त्यांचा लाभ गरीब वा छोट्या शेतकऱ्यांपेक्षा मुख्यत्वे बड्या शेतकऱ्यांस झालेला दिसेल. वास्तविकपणे या संस्था त्यांच्यासाठी नव्हेत. मागील काळात काही झालेले असो; यापुढे मात्र सामान्य माणसाच्या सामाजिक व राजकीय आशा-आकांक्षांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. सहकारी संस्थांनी ही गोष्ट नीट ओळखली पाहिजे. सामान्य व गरीब माणसांच्या गरजा भागू शकतील अशा रीतीने या सहकारी संस्थांच्या नियंत्रण शक्तीचे विकेन्द्रीकरण झाले पाहिजे. हितसंबंधीतांनी ही बाब लक्षात घेऊन त्या मार्गात अडथळे आणू नयेत. उलट, बदलेली परिस्थिती ध्यानात घेऊन गरिबांच्या उत्कर्षासाठी सर्व सहकार्य करावे.

### आधुनिकीकरणामुळे ग्रामीण बेकारीस आळा बसेल

शेतकी आणि आनुषंगिक धंदे यांच्यात आधुनिकीकरण आणण्याबाबत सहकारी संस्थांनी पुढाकार घेण्याची प्रवृत्ती पाहिजे तशी दिसत नाही ही या क्षेत्रातील दुसरी उणीव होय. यासंबंधात नीट प्रयत्न झाल्यास ग्रामीण विभागांचा कायापालट होऊ शकेल व शेतमालाची साठवण, वाहतूक, प्रक्रिया व खरेदी-विक्री या आनुषंगिक धंद्यांचा व सोईचा समतोल विकास साधल्यास ग्रामीण विभागातील बेकारीवर तो चांगला तोडगा ठरू शकेल.

सहकारी क्षेत्राचा निकोप विकास होण्यासाठी लागणाऱ्या कार्यक्षम व व्यवस्थापकीय अधिकाऱ्यांची भासणारी अडचण ही या क्षेत्रांतील तिसरी उणीव होय. त्या दृष्टीने वैकुंठ मेहता व इतर संस्थांच्या व्यवस्थापकांना प्रशिक्षण देण्याचे प्रयत्न चालू आहेत हे खरे. तथापि या बाबतीत अद्याप प्रगतीस बराच वाव आहे.

### काही योजनांची आखणी खालून होत जावी

काही विशिष्ट क्षेत्रांतील योजनांची आखणी खालून होत जावी याची गरज लोकशाही नियोजनकार्यात असते. त्या दृष्टीने पाहता सहकारी क्षेत्राची यंत्रणा उत्तम ठरू शकेल. यापूर्वी यासंबंधात काही अपयश पदरी आले असले तरीही या क्षेत्राने धीराने पुढे पाऊल टाकावे व ग्रामपंचायत व स्थानिक सहकारी संस्था यांच्या विकास कार्यक्रमांत सुसूत्रता साधावी. एखादा जिल्हा निवडून जिल्ह्याच्या नियोजनाचा आराखडा आखावा अशी सूचना मागे मी काही प्रमुख अर्थतज्ज्ञांना केली होती. विकास गट असलेल्या विभागात अशाच स्वरूपाचा नियोजनाचा आराखडा सहकारी क्षेत्रातील नेत्यांनी तयार करावा. स्थानिक विकासाच्या सुसूत्र योजना त्यामुळे उपलब्ध होतील व त्यांचा पाचव्या पंचवार्षिक योजनेत विचार होऊ शकेल (मध्यवर्ती नियोजन खात्याचे मंत्री, श्री. सुब्रह्मण्यम् ह्यांचे 'सहकारी विकासासाठी नियोजन' ह्या परिसंवादाच्या उद्घाटनाचे भाषण.)

---

### "कारकुनीपेक्षा झाडलोटीचे काम कमी अप्रतिष्ठित नाही"

"हार्वर्डच्या पीएच्. डी. च्या उमेदवार स्त्रीला मोलकरणीची नोकरी पाहिजे" अशी जाहिरात कु. कॅरोल रॉबर्टस ह्या २४ वर्षे वयाच्या कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या पदवीधर स्त्रीने 'हार्वर्ड क्रिमसन' ह्या वृत्तपत्रात दिली आहे. बॉस्टनच्या आसपास तिला शिक्षिकेची नोकरी मिळू शकली नाही. "माझ्या पेक्षाही उच्च शिक्षण घेतलेल्या माझ्या कित्येक मैत्रिणी मोलकरीण होण्याचे पत्करीत आहेत; तेव्हा माझी परिस्थिती काही जगावेगळी नाही. झाडलोट करण्यासाठी दर तासाला १८.७५ रुपये ह्या दराने आठवड्याचे पाच दिवस काम देऊ करणारे कित्येक जण आहेत.

बँकेत किंवा कचेरीत काम करण्यापेक्षा हे काम कमी धाई-गर्दीचे असते. ते काम मी करू शकते. पोषाखाचे प्रश्न त्यात उद्भवत नाहीत. फाइलिंग करणाऱ्या किंवा अशीच निर्बुद्ध कामे करणाऱ्या कारकुनीपेक्षा झाडलोट करण्यात कमी अप्रतिष्ठा नाही" असे तिचे म्हणणे आहे.

---

### केवळ महिलांची सहकारी बँक

सांगली भागातील प्रमुख महिला कार्यकर्त्यांची सभा नुकतीच सांगली येथे भरून तीत महिला सहकारी बँक स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. सौ. शालिनीबाई पाटील यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या ह्या सभेत सांगली, मिरज व आसपासच्या काही खेड्यांतील महिला उपस्थित होत्या. सौ. सरोजिनी पाटील यांची या वेळी चीफ प्रमोटर म्हणून एकमताने निवड झाली. या बँकेचे वैशिष्ट्य म्हणजे बँकेच्या संचालक मंडळात सर्व स्त्रिया असतील. मॅनेजरपासून शिपायांपर्यंत सर्व स्त्रियांचाच समावेश असेल. केवळ महिलांची अशी ही बँक महाराष्ट्रात बहुधा पहिलीच असावी.

---

## शेतीच्या उत्पन्नावरील प्राप्तिकरास राज्यांच्या मुख्य मंत्र्यांचा विरोध

मुख्य मंत्र्यांची बैठक गेल्या महिन्यात दिल्ली येथे भरली होती आणि त्यात प्रामुख्याने ज्या एका प्रश्नावर खल करण्यात आला तो म्हणजे शेतीचा प्राप्तिकर आकारणी व कसा गोळा करावा हा होता. भारताचे ५० टक्के उत्पादन शेतीवर अवलंबून असते. पण या प्राप्तीवर कर लावण्यास कोणीच धजत नाहीत. योजना मंडळाचे माजी अध्यक्ष स्वर्गीय डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी सुद्धा शेतीच्या पैदाशीवर कर लावण्याची सूचना वेळोवेळी केली होती. पण पालथ्या घड्यावर पाणी टाकावे त्याप्रमाणे त्या सूचनेचा फारसा विचार झाला नाही. योजनेसाठी साधनसामग्री कशी गोळा करावी याची विवंचना प्रधान मंत्र्यापासून योजनाकारापर्यंत सर्वांनाच लागली आहे. त्यासाठी धाडसी उपाय योजण्यास मात्र आज कोणीच तयार नाहीत. दिल्ली येथे जमलेल्या मुख्य मंत्र्यांच्या या प्रश्नाबाबत बरेच मतभेद दिसून आले. योजन मंडळाचे नवे अध्यक्ष श्री. सी. सुब्रम्हण्यम् यांनी सुद्धा मुख्य मंत्र्यांना कळकळीची विनंती केली की, शेतीच्या उत्पन्नावर कर वसूल करण्यास केंद्र सरकारच्या यंत्रणेशी त्यांनी सहकार्य करावे. पण बऱ्याच मुख्य मंत्र्यांनी योजना मंडळाच्या अध्यक्षाच्या सूचनेकडे कानाडोळा केला व प्रश्न तसाच लोंबकळत राहिला.

### शेती उत्पन्नावरील कर

आज उत्पन्नावरील कर आकारण्याच्या पद्धतीत बरीच तफावत आहे. शहरी भागावर उत्पन्नाच्या कराचा बोजा सर्वात जास्त आहे. शेती वगळून इतर जी मालमत्ता आहे ती साधारपणे १७,००० कोटी रुपयांवर आहे आणि त्यावर ७८० कोटी रुपये कर गोळा केला जातो. या उलट शेतीची मालमत्ता एकूण १५,००० कोटी रुपये असताना त्यावर प्राप्तिकर आकारणी फक्त ११ कोटी रुपये केली जाते. हे असे का ? वित्तमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी सुद्धा याबाबत हात टेकले असल्याचे कबूल केले. केंद्र सरकारने थोड्या व्यक्तींच्या हातात पैसा साचू नये यासाठी जे उपाय योजले त्याची जंत्री सांगितली पण ग्रामीण क्षेत्रात तसे उपाय योजण्यास केंद्र असमर्थ ठरले हे मान्य केले. या संदर्भात मुख्य अडचण ही की, घटनेप्रमाणे केंद्राला ग्रामीण क्षेत्रातील साधनसामग्री गोळा करता येत नाही. ते क्षेत्र राज्य सरकारच्या कक्षेत मोडते.

### मुख्य मंत्र्यांचा विरोध

ग्रामीण व शहरी संपत्तीवरील करांची सांगड घालण्याचा हा प्रश्न आहे. पण प्रदेश राज्यांचे मुख्य मंत्री त्याबाबत काही बोलू देण्यास तयार नाहीत. मुख्य मंत्र्यांची मने वळविण्यात योजनाध्यक्ष असमर्थ ठरले आहेत. कारण, समृद्ध व प्रभावी शेतकऱ्यांना नाराज करण्याचा तो प्रश्न आहे. पाचव्या वित्त आयोगाने सुद्धा शहरी व ग्रामीण संपत्तीची सांगड घालण्याची शिफारस केली आहे पण लक्षात कोण घेतो ? तामीळनाडूच्या मुख्य मंत्र्यांनी तर शेतीच्या पैदाशीवरील प्राप्तिकराचे तर सोडाच पण इतर प्राप्तिकर सुद्धा तामीळनाडू सरकार करील अशी सुचना केली. सबब ग्रामीण भागातील प्राप्तिकर वसुलीचा प्रश्न तसाच भिजत पडला आणि मुख्य मंत्र्यांनी एक तज्ज्ञांची कमिटी नेमून त्याकडे या प्रश्नाचा सर्वांगीण विचार करण्याचे सोपविले. — सहकार शक्ती

---

## ट्रेझरीच्या कामकाजात सुधारणा करण्याचे केंद्रीय अर्थमंत्री श्री. चव्हाण यांचे राज्यांच्या मुख्य मंत्र्यांना आवाहन

केन्द्रीय अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी सर्व राज्यांच्या मुख्य मंत्र्यांना पत्रे लिहून ट्रेझरीच्या कामकाजात सुधारणा करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. सरकारी खर्चातील वाढ व अपुरे कर्मचारी यामुळे ट्रेझरीवर पडणाऱ्या ताणाबद्दल व त्यामुळे कामकाजावर होणाऱ्या दुष्परिणामाबद्दल चिंता व्यक्त करून अर्थसंकल्प नियंत्रण सुधारण्यासाठी त्याचप्रमाणे योजनेच्या अंमलबजावणीवर अधिक चांगले लक्ष ठेवण्यासाठी ट्रेझरीच्या कामकाजात सुधारणा करण्यासाठी उपाय योजावेत असे आवाहन श्री. चव्हाण यांनी या पत्रात केले आहे. ट्रेझरीच्या कामकाजाबद्दल प्रशासन सुधारणा आयोगाने अनेक सूचना केल्या होत्या. पर्यवेक्षक पदावर अर्थ व लेखा सेवेतील अधिकारी असावेत, कर्मचारी व कामाचे प्रमाण निश्चित करून द्यावे, कर्मचाऱ्यांना पद्धतशीर प्रशिक्षण द्यावे, ट्रेझरीसाठी स्वतंत्र संचालनालय असावे आदि सूचनांचा त्यात समावेश होता. या सूचना केन्द्र सरकारने मान्य केल्या असून राज्यांनीहि त्या स्वीकाराव्यात व त्यांची अंमलबजावणी करावी अशी सूचना अर्थमंत्र्यांनी केली आहे.

---

## हिंदुस्तान एरोनॉटिक्सचा कर्मचाऱ्यांच्या मृत्यूच्या आपत्तीसाठी रीलिफ फंड

हिंदुस्तान एरोनॉटिक्स लि. च्या नाशिक विभागात कर्मचाऱ्यांनी वरील फंडाची योजना आपखुषीने केली आहे. मार्च आणि मे महिन्यात दोन कर्मचारी मृत्यू पावले तेव्हा त्यांच्या कुटुंबीयांना फंडातून तात्काळ प्रत्येकी ५०१ रु. ची मदत देण्यात आली. १९६७ साली फंड सुरू करण्यात आला, तेव्हापासून आतापर्यंत फंडाच्या आठ सभासद-कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना त्याचा फायदा झाला आहे. फंडाची सभासद-संख्या आता ३,२०० असून १९७० अखेर जमा रक्कम १३,१२२ रु. आहे. फंडाची व्यवस्था सभासदांनी निवडलेले नऊ जणांचे मंडळ पाहाते. प्रवेश फी २ रु. भरून कोणालाही फंडाचे सभासद होता येते. दरमहा १० पैसे किंवा वार्षिक आगाऊ १·२० रु. भरावयाचे असतात. २५ रु. देणारा फंडाचा आजीव सभासद होतो. महिना केवळ १० पैशांत मिळणारी मदतीची हमी, हे ह्या फंडाचे वैशिष्ट्य आहे.

# एका चीफ एक्झिक्यूटिव्हची कथा नि व्यथा

(श्री. एफ. सी. गेरा, मॅनेजिंग डायरेक्टर, स्टेट फार्म्स कॉपारेशन ऑफ इंडिया)

सरकारी कंपन्यांच्या प्रमुखांच्या व्यथा आता सर्वांना माहीत झाल्या आहेत. पण या प्रमुखांच्या दैनंदिन जीवनात काही गमतीजमतीचे प्रसंगही येतात. हे मात्र फारसे कोणाला माहीत नसते.

### स्मरणिकासाठी जाहिराती

माझ्या रोजच्या टपालात चारदोन तरी पत्रे जाहिरात मागण्यासाठी आलेली असतात. अनेकविध कारणांसाठी जाहिरात मागितली जाते. एकादी संस्था एकाद्या मंत्र्याच्या वाढदिवसानिमित्त स्मरणिका प्रसिद्ध करणार असते व त्यासाठी त्यांना जाहिरात हवी असते, तर दुसरी एखादी संघटना कुठल्या तरी परदेशाशी झालेल्या व्यापारी कराराच्या पहिल्या, पाचव्या किंवा दहाव्या वाढदिवसानिमित्त स्मरणिका प्रसिद्ध करणार असल्याने त्यासाठी त्यांची जाहिरातीची मागणी असते. काही जण तर नृत्यमहोत्सवाचे वेळी स्मरणिका काढणार असतात – या स्मरणिकांतून जाहिराती देणे हे आमच्या कंपनीचा धंदा वाढण्यास बिलकुल उपकारक ठरणारे नसते हे माहीत असूनही या मागणीपत्रांचा वर्षाव माझ्यावर होत असतो. सरकारी कंपन्यांकडे जणू गडगंज पैसा असतो आणि असलाच तर तो कसाही उडविण्यास आम्ही मोकळे असतो अशीच बहुतेकांची खात्री दिसते.

### आधी लेख आणि फोटो, मग फुलपेज जाहिरात

माझ्या टपालात आढळणारी दुसरी रोजची पत्रे म्हणजे फलाणे साप्ताहिक, पाक्षिक किंवा मासिक यांच्याकडून आलेली. या नियतकालिकांची नावे मी सरकारी कंपनीत येईपर्यंत कधी ऐकलेलीही नसतात; त्यांना आमच्याकडून लेख हवे असतात. आणि लेखासोबत माझा एक फोटोही ते न चुकता मागतात. पण खरी ग्यानबाची मेख वेगळीच असते. त्यांना माझ्या कंपनीची एक फुलपेज जाहिरातही हवी असते. आणि त्यांचे जाहिरातीचे दर असे अव्वाच्या सव्वा असतात की, जणू काय त्यांचा खप अखिल ब्रह्मांडाच्या कानाकोपऱ्यांतून होत असावा! यांचीही समजूत असते की, सरकारी कंपन्याजवळ वाटेल तेवढा पैसा पडून आहे आणि त्याचे काय करावे हा आम्हांला प्रश्न पडलेला आहे.

### इमारत फंडास देणग्या

नियतकालिकांचे एक असो. त्यांच्या मागणीचे काही समर्थन तरी करता येईल. कारण ते जाहिरात छापणार असतात. पण काही संस्थांकडून त्यांच्या इमारतफंडासाठी देणग्या मागणारी पत्रे येतात. त्यांची दृढ श्रद्धा असते की, काही झाले तरी त्यांची संस्थेची दिल्लीत स्वतःची इमारत असलीच पाहिजे, आणि त्यासाठी आमच्या सरकारी कंपनीने त्यांना सढळ हाताने उदार देणगी दिलीच पाहिजे.

### आर्थिक नि सांख्यिकीय संस्था

यानंतर येतात आमच्या आर्थिक नि सांख्यिकीय संस्था. अशा किती तरी संस्था असतात व आम्ही त्यांचे सदस्य व्हावे म्हणून त्यांचा ससेमिरा आमच्या मागे लागतो. त्यांची वार्षिक वर्गणी चार अथवा पाच अंकी असते. या सर्वांचे सदस्यत्व घेणार तरी कसे आणि त्यापासून फायदा तरी काय होणार?

### मॅनेजमेंट कोर्सेस

यानंतरचा वर्ग म्हणजे ‘आम्हांला’ शिक्षण देऊ इच्छिणारांचा. ‘आम्हांला’ म्हणजे सरकारी कंपन्यातून नोकऱ्या करणाऱ्या आम्हा ‘अडाणी’ प्राधिकाऱ्यांना.

देशात ठिकठिकाणी पावसाळी छत्र्यांप्रमाणे मॅनेजमेंट असोसिएशने निघाली आहेत हे सर्वांना माहीत आहेच. माझ्या रोजच्या डाकेत अशा असोसिएशनांकडून आलेली दोन-तीन पत्रे तरी असतात. व्यवस्थापक, प्रशासक, हिशेबनीस, स्टोअरकीपर, पर्यवेक्षक, इंजिनिअर, इत्यादी इत्यादींसाठी ही असोसिएशने प्रशिक्षणासाठी विविध कोर्स आयोजित करण्यात सदैव गुंतलेली असतात. एकदा तर एका असोसिएशनने ‘बिहेव्हिरल रेस्पॉन्स ऑफ चीफ एक्झिक्यूटिव्हज् अंडर लॅबोरेटरी कंडिशन्स’ या विषयावर आमच्यासाठी कोर्स आयोजित करण्यास कमी केले नव्हते. हे कोर्स आलिशान हॉटेलातून, पुष्कळदा तर थंड हवेच्या ठिकाणी, घेण्यात येतात. आमच्या मागे कंपनीच्या कामाची जबाबदारी नसती तर अशा कोर्सना उपस्थित होण्यास खरे तर आम्हास मजा वाटली असती. या कोर्सची फी कित्येकदा चार आकड्यातही असते. आमच्या कंपन्यांच्या हितासाठी आयोजित होत असलेल्या या कोर्सना आमची माणसे पाठवत राहायचे म्हटले तर आम्हांला अधिकाऱ्यांचे दोन-दोन संच तयार ठेवावे लागतील; म्हणजे एक संच कोर्सला गेला तर दुसरा संच कंपनीत काम करील व दुसरा संच कोर्सला जाईल तेव्हा पहिला संच कामाला शिल्लक राहील.

### कोर्सचे फायदे : कागदांचे गठ्ठे

या कोर्सना हजर राहण्यात एक फायदा मात्र खचित असतो. तो म्हणजे त्या त्या कोर्सला अनुलक्षून अशा वाङ्मयाचे जंगी भारे शिक्षणार्थींना फुकट देण्यात येतात. हे गठ्ठे आमच्या ग्रंथालयाचे भूषण होऊन राहतील. मग आमच्या अधिकाऱ्यांना ते वाचण्यास वेळ न का असेना. एकदा रु. ५०० फी देऊन आमच्या कंपनीने मला एका कोर्ससाठी पाठविले होते. या दोन दिवसांच्या कोर्समध्ये मला झालेला सर्वात मोठा फायदा म्हणजे कोऱ्या कागदांचे मला देण्यात आलेले एक पॅड. कोर्स संपल्यावर मी ते त्यातील अखेरचा कपटा संपेपर्यंत वापरीत होतो.

या संदर्भात मला महात्मा गांधींची एक आठवण येथे सांगावीशी वाटते. महात्माजी गोलमेज परिषदेस हजर राहण्यासाठी समुद्रमार्गे चालले होते. जहाजावर त्यांच्याबरोबर इतर अनेक प्रवासीही होते. या प्रवाशांनी दररोज एक पानाचे एक वृत्तपत्र प्रसिद्ध करण्याचा बूट काढून तो अमलातही आणला. त्यातील एकाने या दैनिकाचा अंक महात्माजींना नेऊन दिला. त्या वेळी महात्माजी कामात होते. त्यांच्याजवळच एक कात्री पडलेली होती. त्यांनी कात्री हाती घेऊन त्या वृत्तपत्राच्या तळचा कोरा कागद तेवढा कापून घेतला व तो जपून ठेवीत ते आपले खास हास्य करून म्हणाले, 'या पत्रात एवढाच भाग फार उपयुक्त आहे.'

### नोकरीसाठी वशिले

अमक्यातमक्याला नोकरी द्या म्हणून सांगणारे अनेक फोन तर मला रोजच येत असतात. माझ्या एका परिचिताने आपल्या दोस्ताला नोकरी देण्याबद्दल मला परवाच फोन केला होता. दोन-चार दिवस वाट पाहून माझ्या परिचिताने मला पुन: फोन करून स्मरण केले. पण ज्याच्यासाठी ही खटपट चालली होती तो आधी सरकारी नोकरीत होता व सरकारने त्याला डिसमिस केले होते. म्हणून अशा माणसाला आमच्याकडे घेता येणार नाही असे मी परिचिताला सौजन्यपूर्वक सांगितले. तेव्हा तो परिचित म्हणाला, "सरकारने डिसमिस केलं म्हणून काय झालं ? तुमचं तर पब्लिक सेक्टर अंडर-टेकिंग आहे.!"

"ते खरं हो. आमची ही पब्लिक सेक्टरमधलीच कंपनी आहे. पण सरकारनं डिसमिस केलेल्या इसमाला आमच्याकडे नोकरीत घ्यावं असं कसं म्हणता तुम्ही ?"

"तुम्ही तरी अजबच दिसता हो" परिचित जरा चिडून म्हणाला, "अशा लोकांना पब्लिक सेक्टरमध्ये प्रमुख म्हणून नेमतात तरी कसे ?"

यापुढे आमचा फोनवर झालेला संवाद छापण्यासारखा नाही. खरेच, पब्लिक सेक्टरमध्ये काम करण्यास मौज आहे खरी !

'संपदा' – नोव्हेंबर, १९७१

---

### ज्यू शास्त्रज्ञांना रशिआ सोडता येत नाही

रशिआच्या फ्रान्समधील वकिलांनी स्पष्टपणे असे सांगितले आहे की पश्चिम आशिआतील अरब-इस्राइल संघर्ष चालू आहे तोपर्यंत रशिआतील ज्यू शास्त्रज्ञांना व तंत्रज्ञांना रशिआबाहेर जाता येणार नाही. त्यांना तशी परवानगी दिल्यास इस्राइलच्या लष्कराचे बळ वाढण्याची शक्यता आहे ह्याबद्दल खात्री झाल्याचे ते म्हणाले. रशिआतील ज्यू शास्त्रज्ञांना व तंत्रज्ञांना निरनिराळ्या क्षेत्रांतील अनेक गुप्त माहिती आहे. रशिआतील ज्यू शास्त्रज्ञांची संख्या सुमारे ६० हजारांच्या घरात आहे. ते व त्यांच्या कुटुंबांतील माणसे धरून शास्त्रज्ञांच्या व तंत्रज्ञांच्या गटातील ज्यू लोकांची संख्या सुमारे ३ लाख आहे.


तारेचा पत्ता : "मॉर्गेज" नी
दूरध्वनी
मुख्य कार्यालय : २६७८० १/२/३ (३ लाईन्स)
कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट लाईन)
उपकार्यालय नं.१: २६०३०६ नं.२: २९०००६

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ रा माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.
(स्थापना १९३५)

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७० अखेर बँकेचे भागभांडवल ७ कोटी ८१ लाख, गंगाजळी ५६ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ३६ कोटी व येणे कर्ज १०४ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी : ९ बेक हाऊस लेन, फोर्ट मुंबई १.

प्रादेशिक कचेरी : महाल, नागपूर

| सांपत्तिक स्थिती | ३०-६-१९७१ रोजी |
|---|---|
| १. भांडवल व निधी | रु. १८८५ लाख |
| २. ठेवी | रु. ९३३२ लाख |
| ३. कर्जे | रु. १४१८९ लाख |
| ४. एकूण खेळते भांडवल | रु. १९५५१ लाख |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिलवसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक

डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ
कार्यकारी संचालक

श्री. वसंतराव दादा पाटील
अध्यक्ष

# नहीं–
# यह कोई साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और कार्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायऑक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है. २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**




## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन : कार्यालय : २५३३७२ कारखाना : ३७५१०१




तुमच्या हौसेच्या वस्तु तुम्हांला अशाच वारंवार खरेदी करता याव्यात असे वाटते ना? बँक ऑफ महाराष्ट्रच्या रिकरींग डिपॉझीट मधे नियमित पणें पैसे गुंतवा.

**बँक ऑफ महाराष्ट्र**

हेड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे २.

719MAR


हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे-यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)